# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,हिंगोली

**(गृह विभाग, कायदा व सुव्यवस्था)**

E-mail ID :- rdc.hingoli123@gmail.com दुरध्वनी-02456 221450

वाचा-
1. साथ रोग प्रतिबंध कायदा 1978 नुसार.
2. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 नुसार.
3. महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.18/04/2020.
4. या कार्यालयाचे आदेश जा.क्र.२०२०/डी.सि.-०१/करोना/का.वि. दि.19.04.2020
5. महाराष्ट्र शासन आदेश क्र.DMU/2020/CR.92/Dis,-1,dt.21.04.2020

---

जा.क्र.2020/डिसी-1/कोवीड-19/कावी- दिनांक.21.04.2020

**आदेश:-**

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 दिनांक 13.03.2020 पासून लागू करून खंड 2, 3 व 4 मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात (कोव्हीड 19) नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी राज्य शासनाची संदर्भ क्र.3 मधील अधिसूचना नुसार वृत्तपत्र व नियतकालिके यांचे घरोघरी वितरण प्रतिबंधित करण्यात आल्याने या कार्यालयाचे आदेश नुसार हिंगोली जिल्हयातील वृत्तपत्र व नियतकालिके यांचे घरोघरी वितरण बंद करणे बाबत संदर्भ क्र.4 नुसार आदेश पारित करण्यात आले होते. परंतु संदर्भ क्र.5 मधील सूचनानुसार वृत्तपत्र व नियतकालिके घरोघरी वितरण करण्यासाठी सुधारित सूचना प्राप्त झाल्या आहेत.

त्याअर्थी मी रुचेश जयवंशी, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हिंगोली मला प्राप्त अधिकारा नुसार कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून संदर्भ क्र.5 नुसार शासन स्तरावरील प्राप्त सूचनानुसार हिंगोली जिल्हयातील वृतपत्र व नियतकालिके घरोघरी जाऊन विक्री करण्यासाठी खालील अटी व शर्ती नुसार परवानगी देत आहे,

**अटी व शर्ती:**

**१. वृत्तपत्र व नियतकालिके घरोघरी विक्री करते वेळी विक्रेत्यांनी मास्क व sanitizer चा वापर करावा.**

**२. वृत्तपत्र विक्री करतेवेळी social Distancing पाळणे बंधनकारक राहील.**

**३. वृत्तपत्र व नियतकालिके घरोघरी विक्री करण्यापूर्वी सदर वृत्तपत्र व नियतकालिके खरेदी करणाऱ्या ग्राहकाची घरपोच पुरवठा करण्याची लेखी परवानगी घेणे बंधनकारक राहील.**

सदरील आदेशाची आवज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने भारतीय दंड संहिता 1860 चे कलम 188 अन्वये शिक्षेस पात्र असलेला अपराध केला आहे असे मानण्यात येईल. तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005, साथरोग प्रतिबंध कायदा 1897, महाराष्ट्र कोविड-19 उपाययोजना नियम 2020 अंतर्गत संबंधितावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हे आदेश दिनांक.21/04/2020 रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

सही/-
(रुचेश जयवंशी)
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली**

प्रतिलिपी-
1. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद. यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.हिंगोली. यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
3. पोलीस अधिक्षक हिंगोली. यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
4. सर्व उपविभागीय अधिकारी, जिल्हा हिंगोली यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
7. मुख्याधिकारी न.प/न.पं-हिंगोली/वसमत/कळमनुरी/सेनगांव/औंढा यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.
8. जिल्हा माहीती अधिकारी हिंगोली यांना प्रसिधीस्तव.

(रुचेश जयवंशी)
**जिल्हादंडाधिकारी हिंगोली**

Scanned by CamScanner